# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'' (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ''

(विद्या विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१,२५६०६२४


क्र. विद्या / ३३६ दिनांक ६ डिसेंबर २०१७

## अधिसुचना

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, दिनांक २८ सप्टेंबर २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना क्र.विद्या १२२० नुसार गडचिरोली व चंद्रपुर या जिल्हयातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणीक हित लक्षात घेता ज्या विद्यार्थ्यांच्या परिक्षेच्या सर्व संधी संपुष्टात आलेल्या आहेत अश्या विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात उपलब्ध समायोजन योजना,विहित अभ्यासक्रम व नियमानूसार हिवाळी २०१६ व उन्हाळी २०१७ या परिक्षांना बसण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली होती त्यानंतरसुध्दा विद्यापीठास परिक्षेच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत विद्यार्थी व महाविद्यालयांचे अर्ज प्राप्त होत होते करीता पदवी/ पदव्युत्तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या परिक्षेसंदर्भात निर्माण झालेल्या समस्येवर निर्णय घेण्याकरीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठातील अधिकाऱ्यांची संयुक्त सभा दि. १६ सप्टेंबर २०१७ रोजी संपन्न झाली या सभेत खालिल प्रमाणे निर्णय घेण्यात आले असुन सभेच्या कार्यवृत्तास मा. कुलगुरू महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम १२(७) अन्वये विद्वत परिषद व व्यवस्थापन परिषदेंच्या वतीने दिनांक २३ ऑक्टोंबर २०१७ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे.

१. हिवाळी २०१७ पासून गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील पदवी/ पदव्युत्तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची परीक्षा गोंडवाना विद्यापीठातील परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार गोंडवाना विद्यापीठ घेईल.
२. या विद्यार्थ्यांचे स्थलांतरण प्रमाणपत्र (Migration Certificate) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना एकमुस्त देण्यात येईल.
३. या विद्यार्थ्यांचे पुर्व परीक्षांचे गुण तालीका नोंदवही (Tabulation Register) गोंडवाना विद्यापीठाला देण्यात येईल.
४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे Civil, Electrical,Mechanical, Computer Science & Engineering,Electronics, Electronics & Telecommunication/Communication Engineering या सर्व अभ्यासक्रमांच्या Credit based Semester Pattern पध्दतीचे परीक्षा योजना व अभ्यासक्रमीका गोंडवाना विद्यापीठाला देण्यात येईल.

उपरोक्त निर्णयानुसार सर्व संबधितांनी आपल्या स्तरावर कार्यवाही घ्यावी.

मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

**प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:**

१. प्राचार्य, गडचिरोली व चंद्रपुर जिल्हयातील अभियांत्रिकी महाविद्यालय
२. मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
३. मा.संचालक (परिक्षा व मुल्यमापन मंडळ),
४. उपकुलसचिव (परिक्षा पुर्व,परिक्षा उपरांत)/ कुलगुरू कार्यालय
५. सहायक कुलसचिव (गोपनीय/ व्यावसायीक परिक्षा)
६. अधिक्षक (निकाल विभाग),
७. मा. कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक,
८. मा. प्र– कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक,
९. डॉ. विना प्रकाशे, माहितीशास्त्रज्ञ,
१०. कुलसचिव गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

(२ ते ९) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

(डॉ. अनिल हिरेखन)
उपकुलसचिव (विद्या)